**मा.श्रीमती मिनल कळसकर, उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली निवडणूक कामकाजाकरिता संगणक, व्हीडीओग्राफी, झेरॉक्स व लेखनसामग्री व इतर अनुषंगिक बाबींचा पुरवठा करणेकामी ई निविदेबाबत खरेदी समितीच्या दिनांक १८/५/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त**

-------------------------

सदर बैठकीस खालील अधिकारी व निविदाकार उपस्थित होते.

१) श्रीमती मिनल कळसकर, सदस्य सचिव तथा उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

२) श्री.अविनाश कुलकर्णी, लेखाधिकारी, अंतर्गत लेखा परीक्षण.

तसेच सदर बैठकीस खालीलप्रमाणे निविदाकार उपस्थित होते.

1)श्री.निलेश प-हाड, इनोव्हेटीव्ह सेंटर प्रा.लि. (संगणक)

2)मे.रेनबो एंटरप्रायझेस तर्फे श्री. प्रविण सिंग,(संगणक व व्हीडीओग्राफी)

3)श्री.गोकुळ गायकवाड, सीईएल कॉम्प्युटर सर्व्हीसेस(संगणक)

4)मे.पिसाईज एंटरप्रायझेस (झेरॉक्स)

5)मे.चॉईस बुक स्टॉल(लेखनसामग्री)

बैठकीच्या प्रारंभी मा.उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी यांचे स्वागत केले.

बैठकीच्या प्रारंभी मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी सर्व अधिकारी यांचा परिचय करुन दिला. तसेच निवडणूक कामकाजाकरिता विवीध बाबींचा पुरवठा करणेकामी प्राप्त झालेल्या निविदांच्या तांत्रिक पडताळणीसाठी खरेदी समितीची बैठक आयोजित केल्याचे सांगितले.

उपस्थित निविदाधारकांना निविदेबाबत काही शंका/अडचणी असल्यास त्या सांगणेबाबत सुचित करणेत आले. उपस्थित निविदाधारक यांनी निविदेबाबत काही अडचणी/शंका नसलेबाबत नमूद केले. तसेच लेखनसामग्री निविदेचे एकूण मूल्य हे रु. ५० लाख इतके असलेचे सदस्य सचिव यांनी नमूद केले.

Scanned with CamScanner

बैठकीच्या शेवटी मा.श्रीमती मिनल कळसकर, उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी सर्व उपस्थित अधिकारी व निविदाकार यांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

(अविनाश कुलकर्णी),
लेखाधिकारी, अंतर्गत लेखा परीक्षण

(मिनल कळसकर)
उप जिल्हाधिकारी तथा
उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत: सर्व संबंधित.

Scanned with CamScanner